
| लातूर | वर्ष ३५ वे | अंक १०१ वा | गुरूवार, दिनांक ०९ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR
(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)  कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## हिंगोली जिल्ह्यात भूकंपाची नोंद

### नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता सतर्क राहण्याचे आवाहन




**लातूर/प्रतिनिधी :** दि. ०९ जुलै २०२६ रोजी पहाटे ०१:३७, ०२:१५, ०२:१७ व ०३:२३ वाजता हिंगोली, नांदेड व परभणी जिल्ह्यांमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. अधिकृत नोंदीनुसार भूकंपाची तीव्रता अनुक्रमे ४.६, ३.६, ३.९ व ४.१ रिश्टर होती. भूकंपाचा केंद्रबिंदू शिरली तालुका वसमत जिल्हा हिंगोली येथे होता. प्राथमिक माहितीनुसार कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही. हिंगोली येथे झालेल्या भूकंपाचे सौम्य धक्के लातूर जिल्ह्यातील काही ठिकाणी (लातूर शहर, निलंगा) जाणवले असल्याची माहिती प्राप्त होत आहे. तथापि प्राथमिक माहितीनुसार कसलीही जीवितहानी किंवा वित्तहानीची नोंद नाही, अशी माहिती लातूर जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

नागरिकांनी भूकंपाचे धक्के बसत असताना पटकन मोकळ्या जागेत जावे, विशेषत कच्चे बांधकाम, (दगड मातीचे बांधकाम) असलेल्या घरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाने दिलेल्या अधिकृत माहितीची व सूचनांची नोंद घ्यावी, असे आवाहन लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

## 'सैराट' फेम अरबाज शेखच्या व्हिडिओनंतर FDA ची मोठी कारवाई; सोलापूरमधील हॉस्पिटलचे मेडिकल सील

**सोलापूर/प्रतिनिधी :** 'सैराट' चित्रपटातील 'सल्या' या भूमिकेमुळे प्रसिद्ध झालेला अभिनेता अरबाज शेख याने सोशल मीडियावर शेअर केलेल्या भावनिक व्हिडिओनंतर प्रशासनाने तातडीने पावले उचलली आहेत. सोलापूरमधील नोबल रुग्णालयाच्या मेडिकलबाबत करण्यात आलेल्या आरोपांची दखल घेत अन्न व औषध प्रशासन विभागाने संबंधित ठिकाणी तपासणी करून गंभीर त्रुटी आढळल्याचे सांगितले आहे. त्यानंतर मेडिकलविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.



**तक्रारीनंतर तातडीने तपासणी**

अरबाज शेखने आपल्या वडिलांच्या उपचारादरम्यान नोबल रुग्णालयातील मेडिकलमधूनच औषधे खरेदी करण्यासाठी दबाव आणण्यात आल्याचा आरोप केला होता. हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर FDA चे अधिकारी रुग्णालयात पोहोचले आणि मेडिकलची तपासणी केली.

तपासादरम्यान अनेक नियमांचे उल्लंघन झाल्याचे प्राथमिक निरीक्षणात समोर आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**तपासात कोणत्या त्रुटी आढळल्या?**

FDA च्या तपासात औषधांच्या प्रिस्क्रिप्शनशी संबंधित आवश्यक माहिती अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले. तसेच रुग्णांना रुग्णालयाबाहेरील कोणत्याही अधिकृत मेडिकलमधून औषधे खरेदी करण्याचा अधिकार आहे, याबाबतचा फलकही मेडिकलमध्ये लावलेला नसल्याचे आढळले.

या बाबी आयुक्तांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने या त्रुटी गंभीर असल्याने संबंधित मेडिकलला औषध विक्री थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**नेमके काय आरोप केले होते?**

अरबाज शेखच्या वडिलांना ब्रेन हॅमरेज झाल्यानंतर त्यांच्यावर सोलापूरमधील नोबल रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान रुग्णालयाशी संलग्न मेडिकलमधूनच औषधे घेण्यास भाग पाडल्याचा आरोप त्याने केला होता. त्याच्या म्हणण्यानुसार, रुग्णालयातील मेडिकलमधून घेतलेल्या औषधांसाठी सुमारे ४० हजार रुपयांचे बिल आले, तर तीच औषधे बाहेरील मेडिकलमध्ये जवळपास २० हजार रुपयांत उपलब्ध झाली असती, असा दावा त्याने केला होता.

यासोबतच खासगी रुग्णालयांमध्ये रुग्णांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचाही आरोप करत त्याने सोशल मीडियावर मदतीचे आवाहन केले होते.

**रुग्णालयाची भूमिका काय?**

दरम्यान, या आरोपांवर रुग्णालय प्रशासनानेही स्पष्टीकरण दिले आहे. रुग्णालयाचे प्रमुख डॉ. अमजद सय्यद यांनी सांगितले की, रुग्णांना आमच्या मेडिकलमधूनच औषधे खरेदी करणे कधीही बंधनकारक केले जात नाही.

त्यांच्या मते, संबंधित रुग्णाला उपचाराचा संभाव्य खर्च आधीच सांगण्यात आला होता. तसेच डिस्चार्ज झाल्यानंतर अशा प्रकारचे आरोप का करण्यात आले, याची माहिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## लातूरमध्ये अभाविपचा ७८ वा स्थापना दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप)च्या ७८ व्या स्थापना दिनानिमित्त लातूर महानगरात विविध सेवा, पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थी संपर्क उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. गरजू विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वितरण, विद्यार्थी व शिक्षकांना स्थापना दिनाच्या शुभेच्छापत्रांचे वाटप तसेच दुपारच्या सत्रात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत स्थापना दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

स्थापना दिनानिमित्त सकाळी विविध महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांना अभाविपच्या ७८ व्या स्थापना दिनानिमित्त विशेष शुभेच्छापत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी परिषदेच्या ज्ञान-शील-एकता या ब्रीदवाक्याची माहिती देण्यात आली. विद्यार्थीहित, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सामाजिक उत्तरदायित्व आणि राष्ट्रनिर्माणात युवकांची भूमिका याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि पुस्तकांचे वितरण करण्यात आले. शिक्षणासाठी आवश्यक साधनांची कमतरता कोणत्याही विद्यार्थ्याच्या प्रगतीत अडथळा ठरू नये, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला विद्यार्थी आणि शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दुपारच्या सत्रात पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अभाविपच्या कार्यकर्त्यांनी महाविद्यालयीन परिसर तसेच सार्वजनिक



ठिकाणी विविध वृक्षांची लागवड केली. वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा उपक्रम न राहता त्यांचे संवर्धन करण्याचाही संकल्प सर्व कार्यकर्त्यांनी केला.

यावेळी कार्यकर्त्यांनी नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत अभाविपचा इतिहास, कार्यपद्धती आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास, रोजगाराभिमुख शिक्षण, संशोधन, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्र आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी परिषद सातत्याने कार्यरत असल्याचे सांगण्यात आले. महाविद्यालयीन जीवनात केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे, तर सामाजिक जाणीव आणि राष्ट्रसेवेची भावना विकसित होणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही ९ जुलै १९४९ रोजी स्थापन झालेली देशातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना मानली जाते. गेल्या ७८ वर्षांमध्ये परिषदेने शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर प्रभावी भूमिका मांडत विद्यार्थीहितासाठी सातत्याने संघर्ष केला आहे. त्याचबरोबर आपत्ती व्यवस्थापन, रक्तदान शिबिरे, पर्यावरण संवर्धन, ग्रामविकास, सामाजिक समरसता, महिला सक्षमीकरण, क्रीडा आणि सेवा कार्य अशा विविध माध्यमांतून समाजजीवनातही उल्लेखनीय योगदान दिले आहे.

स्थापना दिनानिमित्त लातूरमध्ये आयोजित उपक्रमांना विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिक्षण, सेवा, संस्कार आणि राष्ट्रनिर्माण या मूल्यांचा वारसा जपत समाजाभिमुख कार्य अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

### प्रभात किरणे

चिंता, काळजी,अति विचार करती
रात्री झोपेत मेंदू सक्रिय स्वप्न पडती
कष्ट करीता,शरीरास गरज आरामाची
थकतात मेंदू आणि मन ही मानवाची

– इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## दुधात भेसळ करण्यासाठी साठवलेले १ हजार ४२५ किलो घातक पावडर जप्त

**औसा/प्रतिनिधी :** दुधात भेसळ करण्यासाठी साठवून ठेवलेल्या तब्बल १४२५ किलो घातक पावडरचा साठा अन्न व औषध प्रशासन विभागाने औसा तालुक्यातील किल्लारी येथे उघडकीस आणला. या कारवाईत सुमारे ७५०० लिटर संशयित भेसळयुक्त दुधाचे नमुने घेऊन उर्वरित दूध नष्ट करण्यात आले. या प्रकरणी चौघांविरुद्ध किल्लारी पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसाकडून मिळालेली माहिती अशी की, अन्न व औषध प्रशासन विभागाने किल्लारीवाडी रोडवरील निळकंठेश्वर दूध संकलन व शीतकरण केंद्रावर छापा टाकला. तपासणीदरम्यान दुधात भेसळ करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या पावडरच्या बॅगा आढळून आल्या. या बॅगांचे एकूण वजन १४२५ किलो झाले. कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी सुमारे ७५०० लिटर संशयित भेसळयुक्त दुधाचे नमुने तपासणीसाठी घेतले, तर उर्वरित दूध




नष्ट करण्यात आले. तसेच घातक पावडर, दूध साठविण्याचे साहित्य आदींसह एकूण ५ लाख ३ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी व्यंकट शिवाजी माने (रा. निलंगा), विजय माणिक रूबदे (रा. किल्लारी), भाऊराव सुग्रीव भोसले (रा. किल्लारी) तसेच राकेश रतनलाल पारीक, श्री बालाजी ट्रेडर्स, पद्मावती कॉम्प्लेक्स, जयसिंगपूर (जि. कोल्हापूर) यांच्याविरुद्ध अन्न सुरक्षा अधिकारी पूजा शिवाजीराव शिंदे (अन्न व औषध प्रशासन, लातूर) यांच्या फिर्यादीवरून किल्लारी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## शेतीच्या सुरक्षेसाठी बांधावर किंवा शेताच्या कडेला विद्युत प्रवाहाचा वापर करू नका

### निष्काळजीपणामुळे मनुष्य अथवा जनावरांचा मृत्यू झाल्यास संबंधित शेतकऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल होणार

**लातूर/प्रतिनिधी :** सध्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी शेतातील पिकांचे जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी काही शेतकरी शेताच्या बांधावर अथवा कडेला विद्युत प्रवाह सोडत असल्याचे निदर्शनास येत आहे. मात्र, ही पद्धत अत्यंत धोकादायक असून कायद्यानेही गंभीर स्वरूपाचा निष्काळजीपणा मानला जातो. अशा विद्युत प्रवाहाच्या संपर्कात येऊन जनावरांसह शेतात काम करणारे मजूर, शेतकरी, पादचारी किंवा इतर नागरिक यांचा जीव धोक्यात येण्याची शक्यता असते. काही घटनांमध्ये संबंधित शेतकऱ्यांच्या स्वतःच्या कुटुंबीयांनाही विजेचा धक्का बसून गंभीर अपघात झाल्याची उदाहरणे समोर आली आहेत.

या पार्श्वभूमीवर, कोणत्याही शेतकऱ्याने आपल्या शेताच्या बांधावर अथवा कडेला बेकायदेशीररीत्या विद्युत प्रवाह सोडला आणि त्यामुळे एखाद्या व्यक्तीचा किंवा जनावराचा मृत्यू अथवा गंभीर दुखापत झाल्यास संबंधित शेतकऱ्याविरुद्ध लागू कायद्यानुसार तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी यांना पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी दिल्या आहेत.

लातूर जिल्हा पोलीस दल सर्व शेतकऱ्यांना आवाहन करत आहे की, पिकांच्या संरक्षणासाठी विद्युत प्रवाहाचा वापर न करता कायदेशीर व सुरक्षित पर्यायी उपाययोजना अवलंबाव्यात. मानवी जीवन आणि मुक्या प्राण्यांचे संरक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून, थोड्याशा निष्काळजीपणामुळे जीवितहानी होऊन गंभीर कायदेशीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते.



### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



युद्धबंदीला सुरुंग ?
हॉर्मुजमध्ये तीन तेलवाहू जहाजावर हल्ले...

### चिमटा



दयाचा
विनापरवाना रस्ता खोदला जातो आहे!!
महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत आहे!!
आपघाता होण्याची शक्यता आहे!!!

## शेतमजुराच्या कुटुंबाला ७ वर्षांनी मिळाला न्याय! ॲट्रॉसिटीसह खुनाच्या गुन्ह्यात गुन्हेगारास जन्मठेप

### निलंगा न्यायालयाचा अंतिम निकाल...

**निलंगा/प्रतिनिधी:** शेतातील घराची चावी देण्याच्या किरकोळ वादातून एका ५५ वर्षीय शेतमजुरावर कुऱ्हाड आणि काठीने जीवघेणा हल्ला करून त्याचा खून करणाऱ्या आरोपीला निलंगा येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. बालाजी रामराव वरवटे (रा. पेठ, ता. निलंगा) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी सांगितले, ही घटना १३ मार्च २०१९ रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास निलंगा-अनसरवाडा रोडवरील एका शेतात घडली होती. घराची चावी देण्याच्या कारणावरून आरोपी बालाजी वरवटे याने शेतमजूर अंकुश निवृत्ती आवले (वय ५५ वर्षे) यांच्याशी वाद घातला. या वादातून आरोपीने अंकुश आवले यांच्यावर काठी व कुऱ्हाडीने हात, पाय, पाठ, पोट, छाती आणि कपाळावर गंभीर वार केले. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या आवले यांचा लातूरवरून पुढील उपचारासाठी घेऊन जात असताना १५ मार्च २०१९ रोजी पहाटे मृत्यू झाला.

याप्रकरणी मृताचा मुलगा राम अंकुश आवले याने दिलेल्या फिर्यादीवरून निलंगा पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८६/२०१९ अन्वये भादंवि कलम ३०२ आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमाच्या (ॲट्रॉसिटी) कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**पोलिसांचा तपास व न्यायालयीन लढाई...**

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी गोपाळ रांजणकर व पोलीस निरीक्षक अनिल चोरमले यांनी तपास करून पुरावे गोळा करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. हा खटला निलंगा येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एस.बी. पवार यांच्या न्यायालयात चालला. सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त सरकारी अभियोक्ता के.व्ही. पंढरीकर यांनी युक्तिवाद करत पुरावे मांडले. पैरवी अंमलदार म्हणून एस.के. बुलबुले यांनी, तर न्यायालयीन समन्वय अधिकारी म्हणून सहायक पोलिस निरीक्षक एस.बी. वाघमारे यांनी कामगिरी बजावली.

**निलंगा न्यायालयाचा अंतिम निकाल...**

न्यायालयात सादर करण्यात आलेले वैद्यकीय अहवाल व साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी बालाजी वरवटे याला भादंवि कलम ३०२ अन्वये जन्मठेप आणि ५ हजार रुपये दंड (दंड न भरल्यास १ वर्ष सक्त कारावास) आणि ॲट्रॉसिटी कायद्यानुसार ७ वर्षे सक्त कारावासाची शिक्षा सुनावली.

